0 4 JUL 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुणवंत महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा गौरव

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती'प्राप्त गुणवंत महाविद्यालयांचे प्राचार्य व अधिविभाग प्रमुखांचा गौरव समारंभ विद्यापीठात झाला.

वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या निलांबरी सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत प्रमुख उपस्थित होते. समारंभात नऊ महाविद्यालये व एका अधिविभागाचा गौरव करण्यात आला.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतून विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग, शिवराज कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स व डी. एस. कदम सायन्स कॉलेज, गडहिंग्लज, दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतून देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर, डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठेमहांकाळ (सांगली), मानव्यशास्त्र विद्याशाखेतून न्यू कॉलेज, कोल्हापूर, डी. आर. माने महाविद्यालय, कागल, पद्मभूषण डॉ. क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी आर्टस् कॉलेज, झरे व आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेतून डेक्कन कॉलेज ऑफ इंटिरिअर डिझाईन, कोल्हापूर यांचा समावेश होता.



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासमवेत संलग्नित गुणवंत महाविद्यालयांचे प्राचार्य. (छाया : राज ट्रेनर)

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना प्रशस्तिपत्र, शाल, श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. यात डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. एम. के. पाटील, डॉ. मंगलकुमार पाटील, डॉ. व्ही. ए. पाटील, डॉ. एस. डी. पाटील, डॉ. एस. एम. कदम, डॉ. ए. बी. कोळेकर यांचा समावेश होता. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. उपकुलसचिव अभिजित लिंग्रस यांनी सूत्रसंचालन केले. बी. एम. नाळे यांनी आभार मानले.

पुण्यनगरी



कोल्हापूर : डॉ. सतीश घाळी व प्राचार्य मंगलकुमार पाटील यांचा प्रशस्तिपत्र देऊन गौरव करताना प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. उपस्थित कुलगुरू शिर्के यांच्यासह अन्य.

# डॉ. घाळी महाविद्यालय शिवाजी विद्यापीठात प्रथम

गडहिंग्लज : प्रतिनिधी

येथील डॉ. घाळी महाविद्यालय सलग सात वर्षे शैक्षणिक गुणवत्तेत शिवाजी विद्यापीठात सर्वप्रथम राहिले आहे. सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातही महाविद्यालय वाणिज्य व व्यवस्थापन विभागात निमशहरी गटात विद्यापीठात प्रथम आले.

यावेळी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. सतीश घाळी व प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील यांचा प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे, ए. बी. उंदरे, एन. बी. मासाळ, महेश वंडकर उपस्थित होते.

लोकमत



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी (डावीकडून) जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

लोकमत

# घाळी महाविद्यालय विद्यापीठात प्रथम

गडहिंग्लज : येथील डॉ. घाळी महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्ता यादीत वाणिज्य व व्यवस्थापन विभागात निमशहरी गटात सलग सातव्या वर्षी प्रथम क्रमांक पटकाविला. याबद्दल प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते संस्था कार्याध्यक्ष सतीश घाळी व प्राचार्य मंगलकुमार पाटील यांचा प्रशस्तिपत्र देऊन गौरव झाला. याप्रसंगी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, व्ही. एन. शिंदे, ए. बी. उंदरे, एन. बी. मासाळ, महेश वंडकर उपस्थित होते.

पुढारी

# ‘विवेकानंद’मध्ये ‘क्यूर साहित्य’ विषयावर चर्चासत्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद कॉलेज (स्वायत) कोल्हापूर इंग्रजी विभागातर्फे ‘क्यूर स्टडीज : स्वरूप, व्याप्ती आणि भविष्य’ या विषयावर आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे करण्यात आले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे अध्यक्षस्थानी होत्या.

प्रसिद्ध लेखिका रूथ वनिता म्हणाल्या, भारतीय संस्कृतीमध्ये विवाह संस्था ही करार नसून एक संस्कार आहे. याउलट पाश्चात्य संस्कृतीमध्ये विवाह हा करार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनीही मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात कलकत्ता येथील प्रसिद्ध लेखक कौस्तुब बक्षी, मुंबई विद्यापीठाचे डॉ. सचिन लबडे यांनी मार्गदर्शन केले. प्रांचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी स्वागत केले. डॉ. श्रुती जोशी यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख प्रा. डॉ. कविता तिवडे, डॉ. प्रभा पाटील यांनी करून दिली.

पुण्यनगरी

# आव्हानांना सामोरे जाण्यासाठी दर्जेदार शिक्षण हवे : प्रा. नागला

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

समाजाशी स्पर्धा करायची असेल तर आव्हाने स्वीकारली पाहिजेत. आव्हानांना सामोरे जाण्यासाठी दर्जेदार शिक्षण दिले पाहिजे आणि दर्जेदार शिक्षण घेतलेही पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. बी. के. नागला यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातर्फे स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त 'माझे जीवन, माझा विषय' या विषयावरील ऑनलाईन पद्धतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. जगन कराडे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक डॉ. प्रतिमा पवार यांनी केले, तर सूत्रसंचालन कोमल ओसवाल यांनी केले. व्याख्यानास गुजरातहून माजी कुलगुरू डॉ. विद्युत जोशी, ओडिसाहून डॉ. ईश्वर नायक, औरंगाबादहून डॉ. स्मिता अवचार, माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. बी. पाटील, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. प्रल्हाद माने, अभिजित पाटील, आकाश ब्राह्मणे आदींसह तज्ज्ञ व विद्यार्थी सहभागी झाले होते.